N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण  **P.S.(ठाणे):** सासवड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0419  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 03/09/2026 01:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 02/09/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 02/09/2026
**Time From (वेळेपासून):** 11:29 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:01 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 03/09/2026  **Time (वेळ):** 01:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 03/09/2026 01:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुरंदर तहसिल कार्यालयाजवळ, सासवड, पुणे ,पुरंदर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अविनाश बाबासाहेब घरबुडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे, पुणे,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे, पुणे,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860667770

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय मल्हारी खळदकर | | | 1. कुंभार वळण, ,ता पुरंदर,, सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनातील 500/ रुपये दराच्या 50 नोटा | 25,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फियाद तारीख 03/09/2026

मी अविनाश बाबासाहेब घरबुडे, वय-40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9860667770.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 01/09/2026 रोजी 12.00 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री सतिश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कक्षात बोलावुन श्री मारुती सुभाष कटके, वय 49 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. पुरंदर, जि पुणे. यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. तसेच सदर कारवाई करीता आम्हाला जिल्हा परीषद, पुणे विभागाचे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंचाना आम्ही संपर्क केला असता केला असता पंच 1) श्री. संतोष मोहन रायकर, वय 49 वर्षे व पंच 2) श्री. राजु लक्ष्मण कांबळे, वय 41 वर्षे, ते ला प्र वि कार्यालयात बोलावुन घेतले ते 12.30 वा चे सुमारास ला प्र वि कार्यालयात आले.तसेच सदर कारवाई करीता आम्हास पोशि/95 रवि दिवेकर, म पो.ह./3296 बाळासाहेब गदादे, आणि चालक पो ह 320/दिपक काकडे असे पथक उपलब्ध करुन दिले. पंच, तक्रारदार व सापळा पथकाची आपपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी दोन्ही पंचांची माहिती घेतली. त्यानंतर मी दोन्ही पंचांना तक्रारदार यांची लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले व सदर तक्रारीची पडताळणी करावयाची असल्याचे सांगून पडताळणी पंचनाम्याचा उददे◌्◌ेश व कारवाई पदधत समजावून सांगितली व त्यांना पंच म्हणून काम करण्याची विंनती केली असता त्यांनी पंच म्हणून काम करण्याची स्वखुषीने संमती दर्शविली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी तक्रार लेखी तक्रार दिली की त्यांची भिवरी, ता पुरंदर, जि.पुणे येथे वडीलोपार्जित गट नं 769 मध्ये सात बाराप्रमाणे 0.46.67 आर चौ मी क्षेत्र जमिन दाखवत असल्याने असमान हिश्याचे वाटप झाल्याने ती दुरुस्ती करण्यासाठी मा तहसिलदार,पुरंदर यांचे कडे रिंमान्ड/एस आर/3/2026 दाखल केले होते. मा तहसिलदार पुरंदर यांनी दिंनाक 24/06/2026 रोजी वादी व प्रतीवादी यांना समान संधी देवुन प्रकरण बंद करीत असले बाबत सांगितले. परंतु अदयाप आदेश झाले नसल्याने ते दिंनाक 29/08/2026 रोजी तहसिल कार्यालय पुरदंर कार्यालयात येथे गेले असता त्यांची भेट हे पुरंदर तहसिल कार्यालयातील लेखनिक खळदकर साहेब यांचेशी झाली त्यांनी सांगितले की तुमचे प्रकरण वरीष्ठाकडे आदेशाकरीता ठेवण्यासाठी मला 5000/- रुपये दयावे लागतील. म्हणुन लाच मागणी केली. अशा मजकुराची तक्रार दिली होती. सदर मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी लेखी लिहून दिली. नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जासंबधीत असलेल्या लोकसेवकांकडे पडताळणी बाबत तक्रारदार श्री. कटके यांचेकडे विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगितलेकी मला लोकसेवक श्री खळदकर, लेखनिक तहसिल कार्यालय, पुरंदर, जि पुणे यांनी दिंनाक 02/09/2026 रोजी लाच रक्कम घेवुन भेटायला बोलावले असल्याचे सांगितले. तेथे जावुन लोकसेवक श्री खळदकर यांना भेटणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांना लोकसवक यांचे कार्यालय तहसिलदार आफिस, पुरंदर, जि पुणे येथे पाठवुन लोकसेवक श्री खळदकर यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.सर्वाना गोपनियता बाळगण्या बाबत सांगुन उदईक रोजी 08.30 वा ला प्र वि कार्यालय, पुणे येथे व तक्रारदार यांना सासवड येथे गोपनिय स्थळी भेटण्यास सांगितले.



Scanned with CamScanner

त्या प्रमाणे दिंनाक 02/01/2026 रोजी 09.00 वा चे दरम्यान मी, पंच व सापळा पथक अंमलदार पोशि/95 रवि दिवेकर, म पो.ह./3296 बाळासाहेब गदादे, आणि चालक पो ह 320/दिपक काकडे शासकीय वाहन टीयुव्ही गाडी क्र. एमएच 12 आर वाय 7271 ने ला प्र वि कार्यालय, पुणे येथुन साधु वासवाणी चौक - फामीमानगर - हडपसर - दिवेघाट - सासवड मार्गे -वीर रोड, बैठक हॉटेल शेजारील विठठल मंदिरा समोर सुरक्षित ठीकाणी 10.30 वा चे सुमारास पोहचलो. सदर ठीकाणी तक्रारदार ही त्यांची दुचाकी बजाज चेतक एम एच 12 डब्लु एन 1198 घेवुन आले. पुढील कारवाई हि कोणासही संशय येऊ नये म्हणुन तेथुनच करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर मी तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. आणि माझेकडील एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता, त्यावर सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड त्याचे एका बाजुस SANDISK UITRA 32 GB MICRO SD HC I दुसरे बाजुस 6032 DXCAX08X BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले. त्यामध्ये कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची तक्रारदार व पंचाची खात्री करून दिली. तसेच तक्रारदार, पंच यांचे निवेदन घेतेवेळी पो.ह. गदादे हे शासकीय कॅमेरामध्ये मध्ये चित्रिकरण करतील अश्या सुचना दिल्या.आणि माझेकडील अजुन एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता, त्यावर सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड त्याचे एका बाजुस EVM ELITE 32 GB MICRO SD HC 1 व दुसरे बाजुस EETF32GTK0126 असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड शासकीय कॅमेरामध्ये बसविले. त्यानंतर माझे सुचनेवरुन पो शि क्र 95/दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन प्रथम तक्रारदार, व नंतर पंचाचे सापळापुर्व पडताळणी निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 11:11 वा. होती त्याच वेळेस पो.ह.गदादे यांनी निवेदनावेळेचे चित्रिकरण केले. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून माझे ताब्यात ठेवला. आणि तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास पडताळणी कारवाई अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर माझे सुचनेनुसार पोशि दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजूस कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. कटके व पंच क्र. 1 श्री. रायकर यांना तक्रारदार यांनी आणलेल्या दुचाकी वाहनावरुन लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता पुरंदर तहसिलदार कार्यालय, सासवड, ता पुरंदर, जि पुणे पाठवले ती वेळ 11:29 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक शासकीय वाहनामध्ये बसुन सदर ठिकाणी थांबून राहीलो.

त्यानंतर साधारणपणे 11:52 वाजण्याचे सुमारास तक्रारदार श्री. मारुती कटके व पंच क्र. 1 श्री. संतोष रायकर हे पथक थांबलेल्या ठिकाणी तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने आले तेव्हा पोशि दिवेकर यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून, तो बंद केला. त्यानंतर पंच क्र 1 श्री रायकर यांना रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंचासमक्ष सांगितले कि, “मी व तक्रारदार असे आम्ही लोकसेवक यांची भेट घेणे करीता पुरंदर तहसिलदार कार्यालय, सासवड, ता पुरंदर, जि पुणे येथे गेलो तेथे कार्यालयाच्या पार्कींगमध्ये तक्रारदार यांनी त्यांचे वाहन पार्क करुन आम्ही दोघे पहील्यामजल्यावर नायब तहसीदार यांचे दालनाशेजारील महसुल शाखेच्या रुममध्ये गेलो. तेव्हा लाबुनच उगंली निर्देश करुन हेच लोकसेवक खळदकर असल्याचे तक्रारदार यांनी दाखवले. लोकसेवक श्री खळदकर हे एका टेबलावर बसले होते त्यांचे पुढे कोणीही बसले नव्हते. लोकसेवक खळदकर यांना तक्रारदार दिसताच त्यांनी थांबण्याचा इशारा केला व मागे योण्यास सांगितले मी व तक्रारदार हे लोकसेवक खळदकर यांचे मागो माग तहसिल कार्यालया बाहेर रोहीत हॉटेल जवळ गेलो. त्या दरम्यान तक्रारदार हे लोकसेवक खळदकरांना “काय झालेय, भाऊसाहेब महिना झालय” असे म्हणाले.त्यावेळी लोकसेवक खळदकर यांना तक्रारदार “सही घेवुन टाकतो ” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार लोकसेवक खळदकर यांना “चालेन....तोच विषय होता” असे म्हणाले. तक्रारदार व लोकसेवक यांचेत कामानिमित्त बोलणी चालु असताना त्यावेळी लोकसेवक खळदकर हे तक्रारदार यांना “तुम्ही काय वरच पाचीक दिल की सांगतो , पंचवीसेक घेवून या... तयारी करा उदया सही घेवून टाकू”असे म्हणाले. त्यावर तक्रारदार कटके हे लोकसेवक खळदकर यांना “चालेल... डयुटीला हाय ना ...बाहेर कुठे जाणार नाय ना...” असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा त्यांचेमध्ये बराच वेळ चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक खळदकर यांना “किती करायच सांगा.”असे म्हणाले. त्यावर लोकसेवक खळदकर तक्रारदार यांना म्हणाले की “पंचवीस”. त्यावर तक्रारदार हे लोकसेवक खळदकर यांना “पंचवीस हजार” असे म्हणाले. त्यावर लोकसेवक खळदकर तक्रारदार यांना म्हणाले की “ हं”. तक्रारदार व लोकसेवक यांचेमधील संभाषण संपल्यानंतर मी व तक्रारदार कटके असे सदर ठिकाणाहुन निघुन तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन पथक



Scanned with CamScanner

थांबले त्याठिकाणी परत आलो. असे सांगुन नमुद पडताळणी कारवाई दरम्यान मी व तक्रारदार कटके यांचेसह लोकसेवक खळदकर यांची भेट घेऊन माझे समक्ष मी पाहिले व ऐकले नुसार लोकसेवक खळदकर यांनी तक्रारदार कटके यांचेकडे 25,000/- हजार रुपयांची लाच मागणी केली आहे असे सांगीतले.

त्यानंतर मी पंचांसमक्ष तक्रारदार कटके यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता त्यांनीही पंच क्रं 01 यांनी सांगीतलेप्रमाणेच हकिकत पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. सदर पडताळणी करावाईवरुन लोकसेवक श्री खळदकर, यांनी तक्रारदार मारुती कटके यांना त्याचे वडीलो पार्जित जमिनीच्या सुनावणीचे आदेश प्राप्त करुन देणे करीता 25,000/- रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तक्रारदार यांनी पंचा समक्ष लाच मागणीची तक्रार कायम असल्याचे सांगून पुरंदर तहसिलदार कार्यालय, सासवड, ता पुरंदर, जि पुणे येथे जावुन लोकसेवक श्री. खळदकर यांनी मागणी केलेप्रमाणे लाचरक्कम त्यांना देणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पुढील सापळापुर्व, सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार कटके यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली असता त्यांनी 500 रुपये दराच्या 50 नोटा आणुनहजर करुन त्या त्यांच्या स्वकमाईचे असुन सदर रक्कम सापळा कारवाई करीता वापरण्याचे ठरवले त्याप्रमाणे पुढील सापळापुर्व, सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री.कटके व पंच क्रमांक -1 श्री. संतोष रायकर व पंच क्रमांक - 2 श्री राजु कांबळे यांचे निवेदन 13:24 वा घेण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. सदर निवेंदनाचे चित्रिकरण करण्यात आले. तक्रारदार श्री. कटके यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500/- रुपये दराच्या 50 नोटा एका को–या कागदावर लिहुन घेतले त्यावर मी व पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर पो हकाकडे यांनी शासकीय वाहनात पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा(टॉर्च) व अँथ्रासिन पावडर दाखवून कारवाईतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. तक्रारदार यांनी लाचेकरीता सादर केलेल्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावली. अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार श्री मारुतीकटके यांचे काळया रंगाच्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये खिशात ठेवल्या.

त्यानंतर लाच रक्कम स्वीकारलेनंतर ती हस्तगत करतेवेळी व लोकसेवक यांना ताब्यात घेतेवेळी त्यांचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेत येणार असल्याची माहिती पथकास देवून तक्रारदार व पंचाना व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन लोकसेवक श्री खळदकर यांनी लाच स्विकारल्या नंतर तक्रारदार यांनी कार्यायलयाचे बाहेर आवारात येवुन लाच स्वीकारलेबाबतचा त्यांनी त्यांचे डोकयावरील टोपी काढुन लाच रक्कम स्विकारल्याबाबत ईशारा करणे बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. सापळा पथकातील टीम मधिल सर्वांना काम समजावुन सुचना देण्यात आल्या. त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर मशिन सुरू करून ते तक्रारदार यांचे शर्टलामध्येकोणालाही दिसनार नाही असे आतुन लावला. तक्रारदार श्री कटकेव पंच क्रमांक 01 श्री संतोष रायकर हे लोकसेवक खळदकर यांना भेटण्यासाठी पुरंदर तहसिलदार कार्यालय, सासवड, ता पुरंदर, जि पुणे येथे जाण्याकरीता तक्रारदार यांचे कडील दुचाकी वाहनावरुन 13.44 वा रवाना केले. त्याचे मागुन मी व सापळा पथक, पंच क्रमांक दोन यांचे सह सरकारी वाहनाने सापळा कारवाई करीता तक्रारदार यांचे मागोमाग पुरंदर तहसिलदार कार्यालय, सासवड, ता पुरंदर, जि पुणे कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो.

पुरंदर तहसिलदार कार्यालय, सासवड, ता पुरंदर, जि पुणे कार्यालयाच्या परिसरामध्ये पोहोचुन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबलो असता तक्रारदार यांनी सदर कार्यालयाच्या पार्कींगमध्ये त्यांचे दुचाकी वाहन पार्क करुन तक्रारदार व पंच क्रं 1 हे पहील्यामजल्यावर लोकसेवक श्री खळदकर यांचे कार्यालयात गेले. परंतु पंच व तक्रारदार लाच रक्कम स्वीकारण्याचा इशारा न करता पुन्हा खाली आले व तहसिल कार्यालयाचे वाहन पार्कींग मध्ये एका व्यक्ती सोबत तहसिल कार्यालयाचे बाहेर बोलत-बोलत गेले व काही अंतर चालत गेल्यावर त्याइसमाशी बोलुन झाल्यावर डोक्यावरील टोपी काढुन लाच रक्कम स्वीकारल्या बाबत इशारा केला.

त्यावेळी पो.अंम. दिवेकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला,ती वेळ 14.01 वा ची होती. लोकसेवक खळदकर यांना ताब्यात घेत असताना लोकसेवक खळदकर यांना संशय आल्याने त्यांचे पॅन्टच्या डाव्या



Scanned with CamScanner

खिशातील लाच रक्कम काढुन रस्त्यावर फेकुन दिली.तेव्हा पो शि दिवेकर यांनी लोकसेवक खळदकर यांना ताब्यात घेतले त्यावेळी आरोपी लोकसेवक खळदकर हे खुप घाबरलले दिसले.दिलेल्या सुचना नुसार पो ह गदादे यांनी व्ही डी ओ रेकॉर्डीग सुरु केले. त्यावेळी रस्त्यावर टाकलेली लाच रक्कम पंचासमक्ष मी ताब्यात घेतली. आम्ही आरोपीस आमची ओळख सांगुन त्यांचा नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. विजय मल्हारी खळदकर , वय -57 वर्षे, व्यवसाय - शासकीय कागदपत्रे काढुन देणे, राठी -मु पो कुंभार वळण, ता पुरंदर, जि पुणे असे सांगितले. तेव्हा खळदकर हे लोकसेवक नसुन खाजगी इसम असल्याचे समजले. त्यांनतर पंचा समक्ष आरोपी खाजगी इसम श्री. विजय मल्हारी खळदकर यांनी रस्त्यावर फेकुन दिलेली लाच रक्कम मी पंचासमक्ष नोटांचे नंबर व सापळापुर्व पंचनाम्या दरम्यान कागदावरील लिहलेले नोटांचे नंबर यांची तपासणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. त्यानंतर शासकीय वाहनात कृत्रिम अंधार करुन आलोसे आरोपी खाजगी इसम श्री. विजय मल्हारी खळदकरयांचे दोन्ही हात तपासले असता त्यांचे डाव्या हातांचे तळहातावर तसेच बोटांचे पे-यांवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. तसेच आरोपी खाजगी इसम श्री. विजय मल्हारी खळदकरयांनी सदरची लाच रक्कम स्विकारुन ती पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवली असल्याने पॅन्टच्या खिशास आतील बाजुस व तोंडावर अँथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. वरिल सर्व घटनेचे व्हीडीओ चित्रिकरण केले आहे. तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने तहसिल कार्यालय पुंरदर येथिल संबधीत क्लार्क श्री बंगले यांचेकडुन कागदपत्रे ताब्यात घेतली. मा तहसिलदार पुरंदर यांना सदर बाबत माहीती देण्यात आली.सदरवेळी आरोपीस सापळा करवाईचा उददेश समजावुन सांगुन सापळा पथकासह पुढील कार्यावाही करता सासवड पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले.

आम्ही पंच क्र 1 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार लोकसेवक श्री खळदकर हे त्यांचे कार्यालयात गेलो असता तेथे लोकसेवक खळदकर सदर ठीकाणी उपस्थित नव्हते. तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन लोकसेवक खळदकर यांचे 9922372301 मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता ते तहसिल कार्यालयाचे पार्किंग मध्ये असल्याचे सांगितल्याने मी व तक्रारदार तहसिल कार्यालयायाचे बाहेर आलो तेथे लोकसेवक खळदकर हे एका इसमाशी बोलत होते त्यानंतरत्यांनी चला म्हणुन बरोबर येण्यास सांगितले. मी व तक्रारदार तहसील कार्यालयाचे बाहेर लोकसेवक खळदकर यांचे मागोमाग गेलो त्या इसमाची चर्चा संपल्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक खळदकर यांचे सोबत तक्रारदार याचे कामाबाबत चर्चा केली केली. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक खळदकर यांना "तेवढ आता फोलोफ घ्या तुम्ही" असे म्हणाले त्यावर लोकसेवक म्हणाले "घरच्यावनी करणार" त्यांनतर तक्रारदार व लोकसेवक खळदकर यांचेत इतर चर्चा होवुन लोकसेवक खळदकर तक्रारदार यांना" येवू का माऊली...झालय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार कटकेलोकसेवक खळदकर यांना " पंचविसय" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक खळदकर तक्रारदार यांना "पंचवीसय...पंचवीसय" असे म्हणाले. त्यावरतक्रारदार कटके यांनी लोकसेवक खळदकर यांना " मोजुन घ्या" असे म्हणत तक्रारदार यांनी त्यांचे पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशातुन उजव्या हाताने लाच रक्कम काढुन लोकसेवक खळदकर यांचेसमक्ष धरली. त्यावेळी लोकसेवक खळदकर यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे काळया रंगाच्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा केला. त्यानंतर तक्रारदार कटके यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत हकिकत विचारली असता, त्यांनीही पंच क्रं 01 यांचेप्रमाणेच हकिकत सांगुन लोकसेवक खाजगी इसम खळदकर यांनी लाच रक्कम स्विकारली त्यावेळी पंच 1 संतोष रायकर हे माझ्याबरोबरच होते त्यांनी सर्व घटना पाहीली व ऐकली आहे अशी हकीकत सांगीतली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

आरोपी खाजगी इसम विजय मल्हारी खळदकर , वय - 57 वर्षे, व्यावसाय - शासकीय कागदपत्रे काढुन देणे, राठी - मु पो कुंभार वळण, ता पुरंदर, जि पुणे यांनी तक्रारदार यांचे वडीलोपार्जित जमिनीच्या तहसिलदार पुरंदर यांचे न्यायालयात चालु असलेल्या गट नं 769मधिल जमिनीच्या सुनावणीचे आदेशाची प्रत मिळवुन देणे करीता पंचासमक्ष 25,000/रु लाच रकमेची मागणी करून ती दिंनाक 02/09/2026 रोजी रोहीत हॉटेल पुढे, पुरंदर तहसिल कार्यालयाजवळ, सासवड, पुणे येथे स्वीकारली म्हणुन आरोपी खाजगी इसम विजय मल्हारी खळदकर यांनी आपला प्रभाव वापरुन वरीष्ठांचे मार्फतीने तक्रारदार यांचे काम करुन देतो असे सांगुन, तक्रारदार यांना तहसिलदार कार्यालय पुरंदर यांचे न्यायालयात चालु असलेल्या जमिनीच्या सुनावणीचे आदेशाची प्रत मिळवुन देणे करीता 25,000/रु लाच रक्कम मागणी करुन स्वीकारली आहे म्हणून माझी त्याचेविरुदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7 अ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.



Scanned with CamScanner

दाखल अमंलदार - पो हवा/1974 हाके मो.नं. 8407954566

तपासी अमंलदार - मपोनि असावरी शेडगे,लाचलुचपत प्रतिबधक विभाग पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SANTOSH SHRIMANT GHOLAVE(I (Inspector)) / 11301000362SSGM7401C **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

पोलीस ठाणे अंमलदार
सासवड पोलीस ठाणे

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH SHRIMANT

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 11301000362SSGM740

( अविनाश वा. घरबुडे )
पोलीस निरीक्षक

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner